# मेट्रोचे सर्वात मोठे खोदकाम पूर्ण

**म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई**

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो ३ भूमिगत मेट्रो मार्गातील महत्त्वाचा टप्पा शुक्रवारी पूर्ण झाला. आझाद मैदान ते मुंबई सेंट्रल दरम्यान ३.८१४ मीटरचे भुयारीकरण पूर्ण झाले आहे. केवळ २० महिन्यांत हा बोगदा खोदण्यात आला असून, या प्रकल्पातील हा १५वा बोगदा आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने आत्तापर्यंत १७ टनेल बोरिंग यंत्रांचा वापर करून ३१ किमी भुयारीकरण पूर्ण केले आहे.

वैतरणा-१ या टनेल बोरिंग यंत्राने ही कामगिरी पार पाडली. डाऊनलाइन बोगदा पूर्ण करणारे हे पहिले यंत्र आहे. जमिनीच्या २० मीटर खाली भूगर्भात बेसाल्ट आणि ब्रेसिया या कठीण दगडांतून मार्गक्रमण करीत




- आझाद मैदान ते मुंबई सेंट्रलदरम्यानचा टप्पा
- ३.८१४ मीटरचे भुयारीकरण २० महिन्यांत

यशस्वीरित्या हे काम पूर्ण करण्यात आले. एचसीसी-मॉस्मेट्रोस्ट्रॉय समुहाद्वारे पॅकेज-२ अंतर्गत वैतरणा-१ यंत्र काम करीत आहे. या मोहिमेदरम्यान अनेक आव्हानांना सामोरे जावे लागले. या मार्गात १४ उंच इमारती, २८ ऐतिहासिक वारसा वास्तू आणि अतिशय जुन्या इमारतींचा समावेश होता. वैतरणा-१ यंत्र ३.८१४ किमी अंतर पार करून मुंबई सेंट्रल मेट्रो स्थानकाबाहेर निघाले. मेट्रो-३ मार्गिकेवरील मुंबई सेंट्रल मेट्रो स्थानक, मुंबई सेंट्रल डेपो, मुंबई सेंट्रल उपनगरी आणि मरिन लाइन्स रेल्वे स्थानकांवरील प्रवाशांना भविष्यात या मेट्रो सेवेचा लाभ मिळेल.

'हे अतिशय आव्हानात्मक काम होते. पॅकेज-२चे काम दिलेल्या वेळेत पूर्ण केल्याने आमचा आत्मविश्वास दुणावला आहे', अशी प्रतिक्रिया मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी दिली. या कार्यक्रमास राज्याचे मुख्य सचिव अजय मेहता, पश्चिम रेल्वेचे महाव्यवस्थापक अनिल कुमार गुप्ता उपस्थित होते.